# बातमीपत्र

## पोलीस आयुक्तालय, सोलापूर शहर

## माहिती कक्ष, दि. १३ एप्रिल २०२३

### जोडभावी पेठ पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | १९३/२०२३ भादंविसक ३२४,३२३,५०४,५०६,३४ प्रमाणे |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि०९/०४/२०२३ रोजी २३.३० वा. भवानी पेठ सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि १२/०४/२०२३ रोजी १६.५५ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | रविंद्र बाबुराव जाधव,वय-३६ वर्षे,रा- हनुमान नगर घरनं ४९/५१,भवानी पेठ सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | १) राम अशोक संगर, २) विष्णु सगर, ३) आकाश अशोक सगर, ४) अशोक सगर,सर्व रा हनुमान नगर भवानी पेठ सोलापूर |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, वरील वेळी व ठिकाणी, यातील फिर्यादी हे त्याचे घरी असताना बाहेर रोडवर मोठ-मोठयाने शिवीगाळ करण्याचा आवाज आल्याने फिर्यादी काय प्रकार आहे ते पाहण्याकरीता घराबाहेर गेले असता रोडवर फिर्यादीचा भाऊ ज्ञानेश्वर व किशोर जाधव या दोघांना नमुद आरोपीत मजकूर हे सर्वजण दोन्ही भावास शिवीगाळ करून हाताने मारहाण करीत होते सदरचे भांडण सोडविण्यासाठी फिर्यादी मध्ये पडले असता सर्वानी मिळून फिर्यादीस शिवीगाळ करून हाताने लाथाबुक्यांनी मारहाण करून जीवे मारण्याची धमकी दिली तसेच आरोपी क्र १ याने त्याचे घरातून लोखंडी पार घेवून येऊन फिर्यादीचे डोकीचे वरील बाजूस मारून जखमी केले आहे.म्हणून.तपासः- पोह/५०२/ओव्हळ- |

### सदर बझार पोलीस पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | २४९/२०२३ भादंविसक ३७९ प्रमाणे |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि ०८/०४/२०२३ रोजी ११.०० वा ते १२.०० वा.बी ब्लॉक समोरील पार्किग मधून सिव्हील हॉस्पीटल सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि १२/०४/२०२३ रोजी १२.३० वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | बसवराज संगप्पा तालीकोटी,वय-४४ वर्षे,रा- लेप्रसी कॉलनी कुमठा नाका सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | अज्ञात चोरटा |
| **गेला माल** | | २०,०००/- रू ची लाल रंगाची हिरो एच एफ डिलक्स मो.सायकल |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, वरील वेळी व ठिकाणी यातील फिर्यादीचे ताब्यातील मो.सायकल क्र एमएच १३ सी डब्ल्यू ९३९५ ही वरील ठिकाणी पार्क केली असता कोणीतरी अज्ञात चोरटयाने फिर्यादीची वरील वर्णनाची व किंमतीची मो.सायकल ही फिर्यादीचे संमतीवाचून मुद्दाम लबाडीने चोरून नेली आहे.म्हणून.तपास- पोह/९२४/नदाफ- ९७३०४८११९६ |

### सदर बझार पोलीस पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | २५०/२०२३ भादंविसक ४२०,३४ प्रमाणे |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि १२/०४/२०२३ रोजी १३.१० वा ते १३.३० वा चे दरम्यान फिर्यादीचे राहते घरी सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि १२/०४/२०२३ रोजी १९.४९ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | सुनंदा भगवान कदम,वय-७० वर्षे,रा- घनं २७,शारदा शाळेजवळ कुमार चौक फॉरेस्ट रेल्वेलाईन सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | दोन अज्ञात इसम वय अंदाजे २५ ते ३० . |
| **फसवणुक र** | | ३,९०,०००/- रू त्यात २४ ग्रॅमचे सोन्याचे दोन हातातील बांगडया, ०३ ग्रॅमचे सोन्याचे गळयातील लॉकेट,३० ग्रॅमचे सोन्याचे हातातील बांगडया,१५ ग्रॅमचे सोन्याचे गळयातील मण्याची माळ. |

| | | |
|---|---|---|
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, वरील वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी ही राहते घरी जेवण करीत असताना दोन अज्ञात इसम फिर्यादीचे घरी येवून आम्ही तांब्याचे चांदीचे भांडी आणि दागिने स्वच्छ करून देतो असे सांगून फिर्यादीचे घरातील तांब्याचे ताम्हण तसेच चांदीचे लक्ष्मी देवीची मुर्ती साफ करून फिर्यादीचा विश्वास संपादन करून फिर्यादीने त्याच्या घरातील सोन्याचे दागिने स्वच्छ करून देतो असे सांगून नमुद वर्णनाचे व किंमतीचे सोन्याचे दागिने घेवून त्यांना त्याचे जवळील लाल रंगाचे पावडर लावून कुकरमध्ये हळदआणी पाणी टाकुन ते गरम करा असे म्हणून फिर्यादीचे दागिने कुकरमध्ये ठेवल्यासारखे भासवून दागिने कुकरमध्ये न ठेवता फिर्यादीचे नमुद सोन्याचे दागिने हातचलाखीने अप्रमाणीकपणे घेवून जावून फिर्यादीची फसवणुक केली आहे.म्हणून.तपास- पोसई माळी- **८८८८८५२०९७** |

## विजापूर नाका पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | २०३/२०२३ भादंविसक २८३ प्रमाणे |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि १२/०४/२०२३ रोजी ११.३० वा.जुना विजापूर नाका विजापूर रोड सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि १२/०४/२०२३ रोजी १३.२५ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | पोकॉ/१२६४/नितीन भगवान गायकवाड,नेम- विजापूर नाका पो.स्टे सोलापूर शहर |
| **आरोपीचे नाव** | : | अकबर लाडले मशाक मुजावर.वय-४० वर्षे,रा-झोपडपट्टी नं ०२ चॉदतारा मशीद विजापूर रोड सोलापूर |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, वरील वेळी व ठिकाणी, यातील आरोपीत मजकूर यांनी त्याच्या ताब्यातील चारचाकी हातगाडीवर फळ विक्री करण्याकरीता सार्वजनिक रस्त्यामध्ये थांबवून रस्त्याने येणारे जाणारे लोकांना मोठया प्रमाणात अडथळा निर्माण करून चारचाकी हातगाडी लावलेल्या स्थितीत मिळून आला आहे.म्हणून.तपास पोना/१३७१/परदेशी |

## विजापूर नाका पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | २०४/२०२३ भादंविसक २८३ प्रमाणे |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि १२/०४/२०२३ रोजी १३.०० वा.आसरा चौक होटगी रोड सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि १२/०४/२०२३ रोजी १४.१५ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | पोकॉ/१८१६/सिध्देश्वर कल्याण स्वामी,नेम- विजापूर नाका पो.स्टे सोलापूर शहर |
| **आरोपीचे नाव** | : | नुरअहमद अमिरखान पठाण,वय-३४ वर्षे,रा- साईनाथ भाग-३ मजरेवाडी सोलापूर |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, वरील वेळी व ठिकाणी, यातील आरोपीत मजकूर यांनी त्याच्या ताब्यातील चारचाकी हातगाडीवर फळ विक्री करण्याकरीता सार्वजनिक रस्त्यामध्ये थांबवून रस्त्याने येणारे जाणारे लोकांना मोठया प्रमाणात अडथळा निर्माण करून चारचाकी हातगाडी लावलेल्या स्थितीत मिळून आला आहे.म्हणून.तपास पोना/१५९९/बर्डे- |